बाब क्र.१:

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३०वी बैठक

**दिनांक** : ४ मार्च, २०१० (गुरुवार)

**वेळ** : सकाळी ११.०० वाजता

**स्थळ** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
समिती कक्ष, ६ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**उपस्थित सदस्य** :

| | | |
|---|---|---|
| श्री.जे.पी.डांगे<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर, | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| श्री. रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित** :

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
सचिव,
नगर विकास विभाग, व
सचिव (विशेष प्रकल्प)
सामान्य प्रशासन विभाग (अतिरिक्त कार्यभार)

श्री.एस.व्ही.आर. श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ.सतिश बागल
वित्त सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अड्डूसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (अति.कार्यभार)

श्री.अ.रा.वानखडे
उप महानगर आयुक्त (जमिनी व मिळकती)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.समीर उन्हाळे
उप महानगर आयुक्त (प्रशासन)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या २२९ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ कार्यवृत्त कायम करताना खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

प्राधिकरणाच्या २२९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावर सुधारणा करण्यासंबंधी कार्यकारी समितीचे सदस्य, श्री.एन्.व्ही.मिराणी, यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली व त्यानुसार योग्य ती सुधारणा करण्यात येत आहे.

बाब क्र.३ : पूर्व मुक्त मार्ग भाग पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर-मानखुर्द जोडरस्ता या कामाच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

वरील प्रस्तावाचे कार्यवृत्त कायम करताना परिच्छेद क्र. ३.९, पृष्ठ क्र.१६ ओळ क्र.२ : मूळ **'भिवंडी ROB'** याचेऐवजी **'गोवंडी ROB'** असे वाचण्यात यावे.

बाब क्र. ६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (एमयुआयपी) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून अंमलबजावणी होत असलेल्या (१) सुमन नगर, (२) टाईम्स ऑफ इंडिया, (३) ठाकूर कॉम्प्लेक्स व (४) बर्फीवाला गल्ली येथील उड्डाणपुलांच्या कामाच्या बाबींचे दर २००७-०८ च्या दरसूचीप्रमाणे सुधारीत करण्याबाबत.

वरील प्रस्तावाचे कार्यवृत्त कायम करताना परिच्छेद क्र. ६.२ पृष्ठ क्र.२२ : श्री.एन्.व्ही. मिराणी, कार्यकारी समितीचे सदस्य, यांनी पुढीलप्रमाणे सूचित केले -

The Point 3 was suggested by **me in respect** of the alternative proposal for compensating the contractor and reference here since irrelevant.

याबाबत कार्यकारी समितीमध्ये चर्चा केल्यानुसार कार्यवृत्तामध्ये कोणताही बदल आवश्यक वाटत नाही.

तसेच वरील प्रस्तावातील परिच्छेद क्र.६.३ पृष्ठ क्र.२६ - श्री.एन्.व्ही.मिराणी, कार्यकारी समितीचे सदस्य, यांनी पुढीलप्रमाणे सुचविलेले बदल :

The minutes read as if the Executive Committee has concluded, the officers concerned had taken all necessary action. If the Metropolitan Commissioner had got himself satisfied, it is another matter. सदर प्रस्ताव

..४/-

महानगर आयुक्त यांनी सर्व बाबींचा विचार करुन सादर केलेला असल्यामुळे कार्यवृत्तामध्ये याबाबत कोणताही बदल करण्याची आवश्यकता भासत नाही.

**<u>बाब क्र.७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग १ व ३ च्या ठेकेदाराच्या नुकसान भरपाईच्या मागण्यांची तडजोड करण्याबाबत.</u>**

वरील प्रस्तावाचे कार्यवृत्त कायम करताना पृष्ठ क्र.२६ वरील परिच्छेद क्र. ७.२ मध्ये श्री.एन्.व्ही.मिराणी, कार्यकारी समितीचे सदस्य, यांनी सुचविलेले बदल : -

(अ) Add words "as demanded by contractor" after त्या ऐवजी "तो ८%" in Second Line. महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, कंत्राटदाराने याबाबत वरकड खर्च ८% विचारात घेण्यासंबंधी मागणी केलेली नसल्यामुळे सदर बदल करणे योग्य होणार नाही.

(ब) Add words "& mitigation of losses" after "तो उपलब्ध नसल्यास" in the third line. याबाबत महानगर आयुक्त यांनी पुढील प्रमाणे बदल प्रस्तावित केला व कार्यकारी समितीने मान्य केला.

"विनावापर यंत्रसामुग्रीबाबत योग्य तो तपशिल उपलब्ध नसल्यास, यंत्रसामुग्री विनावापर पडून राहू नये यासाठी केलेले प्रयत्न विचारात घेऊन योग्य तो घटक लावण्यात यावा."

परिच्छेद क्र. ७.४ मध्ये श्री.एन्.व्ही.मिराणी, कार्यकारी समितीचे सदस्य, यांनी सुचविलेले बदल : -

Please refer (i) under this Item of my Note dtd.18/8/2009. I had pointed out during the meeting that para 5 of the Item Note as well as draft resolution need correction namely either (a, b, c, d) or (e) but not all (a, b, c, d, e) as written. Therefore, correct the resolution 1147 accordingly to allow only 4 items otherwise it would result in unintended benefit to the contractor.

या बदलाबाबत चर्चा करुन कार्यवृत्त पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे मान्य करण्यात आले.

ठराव क्र.११४७ मध्ये पुढील परिच्छेद अंतर्भुत करण्यात यावा. "समितीच्या अहवालामध्ये पर्याय 'अ' नुसार खालील बाबींचा विचार करण्यात आला आहे."

अ) मशिनरीच्या मूळ किंमतीसाठी (फिक्स कॉस्ट) लागणारे व्याज.

ब) मनुष्यबळ, यंत्रसामुग्री यामध्ये १०% देण्यात आलेली आगाऊ रक्कम (Mobilisation Advance) मूलभूत धरुन होणारी भाववाढ.

क) साधनसामुग्रीच्या किंमतीमध्ये संबंधित शासन निर्णयानुसार (Government Resolution) होणारी वाढ व संबंधित शासन निर्णय पूर्वलक्षित तत्वावर लागू करणे.

ड) ८% एवढा वरकड खर्च विचारात घेऊन होणारी भाववाढ.

तसेच पर्याय 'ब' पर्याय 'अ' च्या ऐवजी "नवीन दरसुचीनुसार दरवाढ देण्याची शिफारस केली आहे." परंतु ठरावामध्ये पर्याय 'अ' व पर्याय 'ब' अंशतः विचारात घेण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे देशपांडे समितीचा याबाबतचा दृष्टीकोन प्राप्त करुन घेण्यात यावा व कार्यकारी समितीस सादर करण्यात यावा.

१.२ त्यानंतर, वरील सुधारणांसह बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या (१) दिनांक २९ जुलै, २००९ रोजी झालेल्या २२८ व्या व (२) दिनांक १३ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या २२९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या २२८ व्या व २२९ व्या बैठकीच्या कार्यवृत्त अहवालाची अद्ययावत माहिती महानगर आयुक्त यांनी दिली. त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर (गोराई ते मनोरीतर) रस्ता, पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेटी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे - लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सदर काम प्रस्तावित करण्यात आले असून

टप्पा - २ मधील काशिमिरा भाईंदर गोराई मनोरीतर रस्त्यावरील गोराई ते मनोरीतर रस्त्याच्या उर्वरित लांबीची सुधारणा व त्यावरील खाडीवरील ३ कमकुवत पुलांचे बांधकाम (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेटी रस्त्याला जोडणा-या अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करण्याच्या कामास रु.२१.३० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या कामासाठी रु.२०.३८ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्यात आली. सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार निविदा मागविण्यात आल्या. एकुण १६ निविदांची विक्री झाली व विहित कालावधीत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी असलेली मे.श्रीजी कंस्ट्रक्शन कं. यांची निविदा ३३% जादा दराची एवढी होती व ती वाटाघाटीनंतर २१% एवढी कमी करण्यात आली. प्रस्तावानुसार MORTH च्या मानकानुसार २०.९% एवढा जादा खर्च विचारात घेता येतो. तसेच सदर अंदाजपत्रक २००८-०९ वर आधारलेला असल्यामुळे व मधील काळात २००९-१० साठी नविन दरसूची प्रसिध्द झाली असल्यामुळे प्रत्यक्ष भाववाढ ७.९६% एवढी झालेली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता कंत्राटदारांची २१% जादा रकमेची निविदा वाजवी आहे.

३.२ चर्चेदरम्यान मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, रस्त्याच्या निविदा सर्वसाधारणपणे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी येतात. त्यामुळे या कामासाठी एवढ्या जादा रकमेच्या निविदा स्विकारणे योग्य ठरेल काय? यावर उत्तर देताना मुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, या रस्त्याच्या कामामध्ये सुमारे ६०% एवढा खर्च कमकुवत पुलाच्या पुनर्बांधणीसाठी विचारात घेतला आहे व सदर काम भरती ओहोटीच्या अधीन राहून करावयाचे आहे. सर्वसाधारणपणे पूलाच्या कामाची निविदा अंदाजपत्रकापेक्षा जादा येते. असा पुर्वानुभव आहे. श्री.टी.सी.बेंजामिन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग, यांनी अशी विचारणा केली की, या कामासाठी CRZ ची मंजूरी घेण्यात आली आहे काय? यावर मुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, पुलाच्या पुर्नबांधणीचे काम असल्यामुळे आवश्यकतेनुसार मंजुरी घेण्यात येईल.

३.३ कार्यकारी समितीच्या बैठकीस, नवीन सरकार प्रस्थापित होणेमुळे व त्यानंतर अधिवेशनामुळे, विलंब होत असल्याकारणाने काम करण्यासाठीचा उपयुक्त कालावधी वाया जाण्याची शक्यता असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मंजुरीच्या अधिन राहून, निविदा

छाननी समितीच्या मान्यतेनंतर व महानगर आयुक्त यांच्या मंजूरीने दि.२१/१२/२००९ रोजी मे.श्रीजी कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना कार्यादेश देण्यात आले. त्यामुळे या कामासाठी कार्यकारी समितीची कार्योत्तर मंजुरीसाठी विनंती करण्यात आली.

३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ११४९ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत, 'काशिमिरा भाईदर गोराई मनोरीतर (गोराई ते मनोरीतर) रस्त्याचे, पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेटी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे' या कामासाठी मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. २४.६६ कोटी रक्कमेची लघुत्तम निविदा (अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.००% जास्त दराने) स्विकारण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मिठी नदी विकास कामे टप्पा-२ च्या अंतर्गत उर्वरीत संरक्षक भिंती व रस्ता बांधणेच्या खालील कामांच्या लघुत्तम निविदांना कार्यकारी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

**(१) माहिम कॉजवे जवळील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंती व सेवापथांचे बांधकाम करणे. (सा.क्र.०.०० मी. ते सा.क्र.१२८० मी. पर्यंत) (अंदाजित किंमत रु.१२८१.० लाख)**

**(२) मिठी नदीच्या काठालगत वांद्रे-कुर्ला संकुलाच्या बाजूला सा.क्र.२६००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. मध्ये संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.५८०४.० लाख)**

**(३) मिठी नदीच्या काठालगत लालबहादुर शास्त्री मार्गाच्या बाजूला सा.क्र.३५००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. मध्ये संरक्षक भिंत व सेवापथांचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.६०९१.० लाख)**

**(४) वाकोला नाल्याच्या काठालगत सा.क्र.७०५.० मी. ते सा.क्र.२४५०.० मी. मध्ये संरक्षक भिंत व सेवापथांचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.२९५०.० लाख)**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मिठी नदीच्या टप्पा-२ अंतर्गत मिठी नदी व वाकोला नाला येथील संरक्षक भिंत व सेवा पथांचे बांधकाम या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. एकूण काम ४ भागांमध्ये विभागण्यात आले असून या कामाचे अंदाजपत्रक मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनियर्स लिमिटेड या प्रकल्प व्यवस्थापकामार्फत तयार करण्यात आले असून त्याला अभियांत्रिकी विभागामार्फत तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. कामांचा तपशील पुढील प्रमाणे :-

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | माहीम कॉजवे जवळील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंती व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.०.०० मी. ते सा.क्र.१२८० मी. पर्यंत). | रु.१२८१.०० |
| २ | वांद्रे-कुर्ला संकुलाकडील बाजूचे मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे(सा.क्र.२६००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) | रु.५८०४.०० |
| ३ | लालबहाद्दुर शास्त्री मार्गाकडील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.३५००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) | रु.६०९१.०० |
| ४ | वाकोला नाल्याच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.७०५.० मी. ते सा.क्र.२४५०.० मी. पर्यंत) | रु.२९५०.०० |

..९/-

प्रत्येक कामासाठी विहित मुदतीत पुढीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा प्राप्त | पात्र निविदा व देकार | लघुत्तम निविदा |
|---|---|---|---|---|
| १ | माहीम कॉजवे जवळील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंती व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.०.०० मी. ते सा.क्र.१२८० मी. पर्यंत) (रु.१२८१ लाख) | १२ | ९ | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन ३७.१०% कमी |
| २ | वांद्रे-कुर्ला संकुलाकडील बाजूचे मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.२६००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) (रु.५८०४ लाख) | ९ | ५ | मे.डीबीएम जिओटेक्नीक्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन २९.७०% कमी |
| ३ | लालबहादुर शास्त्री मार्गाकडील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.३५००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) (रु.६०९१ लाख) | ९ | ५ | मे.डीबीएम जिओटेक्नीक्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन २९.५२% कमी |
| ४ | वाकोला नाल्याच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.७०५.० मी. ते सा.क्र.२४५०.० मी. पर्यंत) (रु.२९५० लाख) | १३ | ९ | मे. आर. ई. ईन्फ्रा प्रा. लि. ३२.८९% कमी |

४.२ महानगर आयुक्त यांनी या संदर्भात असेही स्पष्ट केले की, वाकोला नाल्याचे बांधकाम केल्यावर पुढील पावसाळयात पावसाच्या पाण्याची समस्या निर्माण होणार नाही. तसेच ६ कि.मी.च्या पट्टयावर नौकानयन सुरु करणे शक्य होईल. सदर कामास सहा महिने कालावधी लागू शकतो.

४.३ चर्चेमध्ये मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर निविदा रास्त असल्याबाबत तपासणी करण्यात आली आहे काय? श्री.मनु कुमार श्रीवास्तव,

..१०/-

सचिव, नगर विकास विभाग, यांनी विचारणा केली की, निविदा खुपच कमी दराच्या असल्यामुळे अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेण्यात आली आहे काय? यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा छाननीसाठी सह महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंता सदस्य असलेल्या समितीने निविदेची छाननी करुन शिफारस केलेली आहे. तसेच १०% पेक्षा जादा कमी दराच्या निविदांसाठी अतिरिक्त सुरक्षा रक्कमही घेण्यात आलेली आहे.

४.४ याबाबत पुढे असेही नमूद करण्यात आले की, कार्यकारी समितीची बैठक, नवीन सरकार प्रस्थापित होणे व अधिवेशन या बाबींमुळे विलंबाने होण्याची शक्यता असल्यामुळे उपयुक्त कामाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यकारी समितीच्या मंजुरीच्या अधिन राहून सर्व कामांसाठी दि.१०/१२/२००९ रोजी कार्यादेश देण्यात आले. सबब, या कामांसाठी कार्यकारी समितीची कार्योत्तर मंजुरीसाठी विनंती करण्यात आली.

४.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५० :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मिठी नदी कामांतर्गत टप्पा-२ मधील उर्वरीत संरक्षक भिंती व सेवापथांची कामे क्र.२, ३ व ४ च्या प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या निविदा स्विकारण्याच्या कार्यवाहीस खालील तक्त्यात दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे कार्योत्तर मान्यता देत आहे. त्या

अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रथम लघुत्तम निविदाकाराचे नाव | लघुत्तम निविदेची रक्कम/टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | माहीम कॉजवे जवळील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंती व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.०.०० मी. ते सा.क्र.१२८० मी. पर्यंत) | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन | रु.८०६.०० लक्ष (वजा ३७.१०%) |
| २ | वांद्रे-कुर्ला संकुलाकडील बाजूचे मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.२६००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) | मे.डीबीएम जिओटेक्नीक्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन | रु.४०८०.०० लक्ष (वजा २९.७०%) |
| ३ | लालबहाद्दुर शास्त्री मार्गाकडील मिठी नदीच्या काठावरील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.३५००.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी. पर्यंत) | मे.डीबीएम जिओटेक्नीक्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन | रु.४२९३.०० लक्ष (वजा २९.५२%) |
| ४ | वाकोला नाल्याच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंतीचे व सेवापथांचे बांधकाम करणे (सा.क्र.७०५.० मी. ते सा.क्र.२४५०.० मी. पर्यंत) | मे. आर. ई. ईन्फ्रा प्रा. लि. | रु.१९८०.०० लक्ष (वजा ३२.८९%) |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचे काम साखळी १०३५२ मी. ते १०७७२ मी. - सदर कामासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदेस मान्यतेसाठी.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अंधेरी घाटकोपर जोडरस्त्यामध्ये सदर मिसिंग लिंकच्या कामाचा अंतर्भाव आहे. या कामासाठी पूर्वी दि.२९/४/२००८ रोजी निविदा प्राप्त करण्यात आल्या होत्या व कार्यादेश देण्यात आले होते. परंतु झोपड्या काढण्यामध्ये बराचसा कालावधी गेल्यामुळे मूळ एक वर्षाच्या मुदतीमध्ये कोणतेही काम होऊ शकले नाही. त्यामुळे निविदाकाराने सदर काम foreclose करण्याची विनंती केली व त्यानुसार काम foreclose करण्यात आले. सदर कामाची निविदा किंमत रु.७९५.७१ लाख

एवढी होती. परंतु त्यानंतर आता झोपड्या काढल्यानंतर तसेच रस्त्याच्या आखणीमध्ये २ पक्क्या इमारतींचे नुकसान टाळण्यासाठी थोडासा बदल केल्यानंतर रु.१२०७.२८ लाख किमतीच्या निविदा मागविण्यात आल्या. एकूण २५ निविदाकारांनी कोरे संच विकत घेतले. विहित कालावधीत ७ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या व ४ निविदाकार पात्र ठरले. यामध्ये मे.रोहित इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची निविदा सर्वात कमी म्हणजेच ३४.२९% कमी एवढी प्राप्त झाली व सदर निविदा, निविदा समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आली. सदर काम मेट्रोच्या आखणीमध्ये येत असल्यामुळे तातडीने करणे आवश्यक होते. तथापि, नवीन सरकार प्रस्थापित होणे व त्यानंतर अधिवेशन यामुळे कार्यकारी समितीच्या बैठकीस होणारा विलंब विचारात घेऊन कार्यकारी समितीच्या मंजुरीच्या अधीन राहून व महानगर आयुक्त यांची मान्यता घेऊन कामाचे कार्यादेश दि.१२/०१/२०१० रोजी देण्यात आले. त्यामुळे कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मुळ foreclose केलेल्या निविदांचा तपशील देण्यात यावा. त्यावर मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, मुळ निविदा रु.७९५.७१ लाख एवढी होती व ती अंदाजपत्रकाच्या २२.७९% एवढी कमी होती व कंत्राटदार मे.रुपेश कॉर्पोरेशन - श्रीकृष्ण कंस्ट्रक्शन (जेव्ही) अशी होती. सध्या प्राप्त झालेली निविदा रु.७९३.३० लाख एवढी आहे व ती मुळ निविदेपेक्षा सुध्दा कमी खर्चाची आहे.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५१ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील साखळी १०३५२ मी. ते साखळी १०७७२ मी. मधील रस्त्याच्या कामासाठी प्राप्त झालेली मे. रोहित इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.२९% कमी दराची म्हणजे रु. ७,९३,३०,९८२/- (रुपये सात कोटी त्र्याण्णव लाख तीस हजार नऊशे ब्याऐंशी फक्त)

किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारणे व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करणे आदिंसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर रस्त्यांच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार हाती घेण्यात येणा-या कामासाठी प्रकल्प समंत्रक मे.पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांच्या कामाचा विस्तार वाढविणेस मान्यता मिळणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती दिली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त मुंबई महानगर क्षेत्रामध्ये मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा विस्तार करुन ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आणि मिरा-भाईंदर महानगर पालिका क्षेत्रातील तसेच पनवेल, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, उड्डाणपूल इत्यादी सुमारे रु.१४९३.२६ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या कामांस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजीच्या १२० व्या बैठकीत ठराव क्र.११४८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

६.२ सदरील ठरावान्वये मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील 'काशिमिरा भाईंदर गोराई मनोरीतर रस्त्याची सुधारणा करणे (१६.५ कि.मी.)' या कामाच्या टप्पा-१ च्या रु. १३.२० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

६.३ सदरील कामाचे सविस्तर सर्वेक्षण, नकाशे व अंदाजपत्रके तसेच प्रकल्प अहवाल, निविदा प्रक्रिया व कामाची अंमलबजावणी करण्याकरीता मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांची प्रकल्पसमंत्रक म्हणून अभियांत्रिकी विभागाने दि. २६/०६/२००८ रोजीच्या आदेशान्वये नेमणूक केली.

६.४ सदर कामाच्या टप्पा - २ अंतर्गत गोराई ते मनोरीतर रस्ता, ३ पुलांची पुर्नबांधणी व रुंदीकरणासह जेट्टींना जोडणा-या रस्त्यांचे जाळे इ. कामांसाठी रु. ३४.५० कोटी इतक्या रकमेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले.

६.५ या प्रस्तावास प्राधिकरणाच्या दि. ३/८/२००९ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीत ठराव क्र. १२२१ अन्वये रु. ३४.५० कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

६.६ आता टप्पा-२ च्या कामाच्या निविदा मागवण्यात आल्या असून त्यास निविदा छाननी समितीने दि.२९/१०/२००९ रोजी मान्यता दिली आहे.

६.७ प्राधिकरणाच्या गरजेनुसार व वरीलप्रमाणे नमूद केलेल्या प्रक्रिया पूर्ण करण्यास उपरोक्त प्रकल्प समंत्रक यांचेकडून टप्पा-२ चे काम निविदा स्तरापर्यंत करुन घेण्यात आले आहे. त्यानुसार समंत्रक मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांनी या रस्त्याचे टप्पा - १ चे व निविदेपर्यंत टप्पा-२ चे काम केल्याने तसेच टप्पा - १ व टप्पा - २ हे मुख्यत्वेकरुन एकाच रस्त्याचे काम असल्याने, मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांना टप्पा २ चे कामही त्यांच्या पूर्वीच्या कामाचा विस्तार वाढवून देणे संयुक्तिक व कामाच्या दृष्टीने सोयीस्कर वाटते. तसा प्रस्ताव तयार करण्यात आला. वित्त विभागाच्या निर्देशाप्रमाणे मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांच्याशी त्यांचे शुल्क कमी करण्याविषयी वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार त्यांनी शुल्क कमी करुन अंतिम शुल्क ३.५% केले आहे. सदर काम मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. यांना दिल्याने खालील आर्थिक बदल होत आहे.

| अ. क्र. | टप्पा | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये) | समंत्रकाचे शुल्क | रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | टप्पा-१ | १३.२० कोटी | ४% | ०.५२८ कोटी | प्र.मा. मुळ रु.१३.२० कोटी |
| २ | टप्पा-२ | २१.३० कोटी | ३.५% | ०.७४५ कोटी | सुधारित प्र.मा.३४.५० |
| | एकूण | ३४.५० कोटी | | १.२७३ कोटी | |

वरीलप्रमाणे विश्लेषण केल्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

६.८ चर्चेदरम्यान, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, अशा त-हेने सल्लागारांचे अतिरिक्त फी साठी मंजुरी देण्याचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत काय? यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मूळ कामासाठी मंजुरी

(empanelment) सूचीनुसार ऑफर्स मागविण्यात आल्या व त्यानंतरच सर्वात कमी दराची ऑफर स्विकारण्यात आली. सदर काम मूळ रस्त्याच्या आखणीमधील असल्यामुळे नवीन ऑफर्स मागवून वेगवेगळ्या सल्लागारांना नेमणे संयुक्तिक होणार नाही. तसेच सल्लागारांनी उर्वरित कामासाठी त्यांचे शुल्क मुळ ४% वरुन ३.५% एवढे कमी केलेले आहे.

६.९ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५२ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, मे. पेन्टॅकल कन्सल्टंट प्रा. लि. या प्रकल्प समंत्रकांनी काशिमिरा-भाईदर-गोराई-मनोरीतर (गोराई ते मनोरीतर) रस्त्याचे, पुलाचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेटी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे, या प्रकल्पांसाठी करण्यात येणा-या पूर्ण कामासाठी रु.१२७.३० लक्ष + सेवा करांच्या खर्चास संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : पूर्व मुक्त मार्गाच्या (Eastern Freeway) भाग पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर या मार्गासाठी फेज-१ (उर्वरीत) कामासाठी सल्लागारानी केलेल्या वाढीव कामाच्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

७.१ याबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व मुक्त मार्गाचा (Eastern Freeway) म्युझियम ते आणिक व आणिक ते

..१६/-

पांजरपोळ जोडरस्ता या भागाची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तावित पूर्व मुक्त मार्गाच्या योजनेप्रमाणे पांजरपोळ ते घाटकोपर रस्ता विकसित करणे गरजेचे असून तसे केल्यास त्याचा वापर पूर्व द्रुतगती महामार्ग (Eastern Express Highway) तसेच पुणे शहराकडून येणा-या वाहनांना मुंबईकडे जाण्यासाठी एक पर्याय उपलब्ध होणार आहे. पूर्व मुक्त मार्गाची एकूण लांबी २४.३० कि.मी. असून कामाच्या सोयीसाठी त्याची ३ टप्प्यात विभागणी केली गेली आहे व ह्या कामांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| <u>भाग पहिला</u> | : म्युझियम ते शिवडी ते आणिक : | या १२.२० किमी. लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी ठेकेदार नेमण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे. |
| <u>भाग दुसरा</u> | : आणिक ते पांजरपोळ : | या ५ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या कामासाठीही ठेकेदार नेमण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे. |
| <u>भाग तिसरा</u> | : पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर : | या ५.१० कि.मी. लांबीच्या रस्त्याचा प्रत्यक्ष अभ्यास (Feasibility study) करणेसाठी महानगर आयुक्त यांच्या संमतीने सल्लागार नेमून अहवाल सादर झाला आहे. (फेज - I - Part करिता) |

७.२ भाग पहिला व भाग दुसरा यांची कामे कंत्राटदार नेमून प्रगतीपथावर आहेत. तिस-या भागाच्या कामास सुरुवात करुन संपूर्ण पूर्व मुक्त मार्ग जड वाहतुकीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुसार तिस-या भागाचा प्राथमिक अभ्यास फेज-१ (Part) करण्यासाठी मे.मोनार्क सर्व्हेयर्स ॲण्ड इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा.लि. ॲण्ड स्ट्रडकॉम कन्सल्टंट प्रा.लि. ॲण्ड कसाड कन्सल्टंट (जे.व्ही.), पुणे यांना दि.०७.११.२००८ पासून सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. सदर फेज-१- (Part) मध्ये खालील कामांचा समावेश होतो. (a) Feasibility study and detailed survey (b) fixing of alignment with alternatives (c) Geo-technical investigations and methodology of improvement if necessary (d) Detailed traffic survey (e) Land acquisition proposal (f) Detailed survey of properties likely to be affected with all details (R&R) (g) Preparation of all detailed drawings (h) Other relevant works. त्यासाठी त्यांना एकत्रित फी रु.२४.७२ लक्ष (अधिक सेवा कर) एवढी ठरविण्यात आली होती. अहवाल सादर करावयाची मुदत चार महिने होती.

७.३ मे.मोनार्क, सल्लागार यांनी त्यांचा फिजीबीलीटी स्टडी अहवाल मार्च, २००९ मध्ये सादर केला. त्यामध्ये नमुद केल्यानुसार पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर या ५ कि.मी. लांबीपैकी पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर मानखुर्द जोडरस्त्यापर्यन्तचे (२.५ कि.मी.) काम ताबडतोब हाती घेता येईल असे दिसून आले व त्यापुढील लांबीमध्ये खाडी, कामराजनगर झोपडपट्टी, कांदळवन असल्याचे आढळून आल्यामुळे या लांबीमध्ये (घाटकोपर मानखुर्द जोडरस्ता ते पूर्व द्रुतगती महामार्ग) काम हाती घेणेसाठी बराच कालावधी जाणार असल्यामुळे सदरच्या भागाचे काम पुढील टप्प्यामध्ये हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

७.४ वरीलप्रमाणे प्राथमिक अभ्यासाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर मानखुर्द जोडरस्त्यापर्यन्तचे बांधकाम खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार तातडीने हाती घेण्याचे ठरविण्यात आले.

१) पूर्व मुक्त मार्गाचा भाग - १ - म्युझियम ते आणिक व भाग - २ - आणिक ते पांजरपोळचे बांधकाम प्रगतीपथावर असून मार्च २०११ अखेर पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे.

२) त्याचवेळेस पूर्व मुक्त मार्गाचा तिसरा भाग पांजरपोळ जंक्शन ते घाटकोपर मानखुर्द जोडरस्ताही पूर्ण करुन, संपूर्ण पूर्व मुक्त मार्गाची लांबी जड वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

३) वरील परिस्थितीचा विचार करता व मे.मोनार्क, सल्लागार यांनी मार्च, २००९ मध्ये अहवाल सादर केल्यानंतर एप्रिल, २००९ ते ऑक्टोबर, २००९ या कालावधी मध्येच संपूर्ण निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास सुरुवात करणे आवश्यक होते. याच कालावधीमध्ये लोकसभा व नंतर विधानसभा यांच्या आचारसंहीतेचा कालावधी येत असल्याकारणाने सर्व प्रक्रियेकरीता कमी कालावधी उपलब्ध होत होता व कामाचे दिवस वाया जाणार होते.

७.५ वरीलप्रमाणे विश्लेषण केल्यानुसार पूर्व मुक्त मार्गाची निकड लक्षात घेता तिस-या भागाची निविदा मागवून प्रत्यक्ष काम ताबडतोब सुरु करावे असे चर्चेअंती ठरविण्यात आले. सदर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी फेज - १ (उर्वरितसाठी) पुन्हा सल्लागाराच्या नव्याने निविदा न मागविता, मेसर्स मोनार्क या पूर्वीच्याच सल्लागारास पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सांगण्यात आले. तसेच त्यांनी या भागाचा प्राथमिक अभ्यास केला असल्यामुळे त्यांना पुढील प्रक्रिया कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य होते.

७.६ त्यानुसार निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी खालील बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना उपरोक्त सल्लागारांना देण्यात आल्या.

१) निविदेसाठीचे आवश्यक संकल्पन तयार करणे, (सविस्तर संकल्पन सोडून)

२) सविस्तर नकाशे तयार करणे

३) सविस्तर अंदाजपत्रक बनविणे

४) निविदेसाठी आवश्यक कागदपत्र बनविणे

५) निविदा प्रक्रिया पुर्ण करुन ठेकेदारास कार्यारंभ आदेश देणे.

७.७ याच कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC - फेज - २) म्हणून मे. स्टूप कन्सल्टंट, मुंबई यांची नेमणूक (निविदा रक्कमेच्या १.६०४% इतक्या दराने) स्पर्धात्मक निविदा मागवून करण्यात आली आहे. मुळ सर्वेक्षणापासून ते अंदाजपत्रक बनविणे, निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदार निश्चित करणे आणि त्यानंतर प्रकल्प राबविणे (PMC) या दोन टप्प्याच्या कामासाठी सर्वसाधारणपणे अनुक्रमे ३०% व ७०% अशी फीची विभागणी केली जाते.

७.८ या कामाच्या टप्पा - २ (PMC) साठी सल्लागारांची नेमणूक स्पर्धात्मक पध्दतीने निविदा रकमेच्या १.६०४% इतक्या दराने निश्चित करण्यात आली आहे. तथापि, टप्पा - १ मध्ये केलेल्या कामाची फी निश्चित करणेसाठी वरील उल्लेखित फी विभागणीचा आधार घेऊन १.६०४% फी ही ७०% भाग समजून, मे.मोनार्क सल्लागार याची ३०% फी ०.६९% इतकी देय होते, (१.६०४ x ०.३०/०.७०=०.६९) तथापि, सविस्तर संकल्पनाचे काम दुस-या सल्लागाराकडे म्हणजे मे. स्टूप कंसल्टंट यांचेकडे सोपविल्यामुळे त्याची किंमत २०% (०.६९% x ०.२०%=०.१४%) इतकी वजा करुन त्यानंतर मे. मोनार्क यांना ०.५५% (०.६९ - ०.१४ = ०.५५%) इतकी फी देय होत आहे.

७.९ प्राधिकरणाच्या गरजेनुसार व वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उपरोक्त सल्लागार यांना पुढील काम करण्यास सांगण्यात आले व त्यानुसार त्यांनी सदरचे काम पूर्ण केले व त्यामुळेच सदर कामाच्या निविदा मागवून संबंधित ठेकेदारास व प्रत्यक्ष व्यवस्थापन सल्लागारास (PMC) कार्यारंभ आदेश देणे शक्य झाले.

..१९/-

७.१० वरीलप्रमाणे विश्लेषण केल्यानुसार निविदा रक्कमेच्या ०.५५% दराने सर्व कामे (फेज-१) करण्याचे अंतिमरित्या ठरले. या कामाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

- अंदाजपत्रकीय रक्कम : १९६.१० कोटी
- निविदा रक्कम : १६२.६१ कोटी
- कामाचे दर : ०.५५%
- सल्लागाराची एकूण देय फी (१६२.६१ x ०.५५%) : ८९.४४ लक्ष + सेवा कर
- यापूर्वी फेज-१ (Part) साठीची मान्य केलेली एकत्रित देय रक्कम : २४.७२ लक्ष +सेवा कर
- वाढीव कामामुळे अतिरिक्त देय रक्कम/वाढीव खर्च:(८९.४४-२४.७२)=६४.७२ लक्ष+सेवा कर

७.११ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५३ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, मे. मोनार्क सर्व्हेयर्स ॲण्ड इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि. ॲण्ड स्टडकॉम कन्सल्टंट प्रा.लि. ॲण्ड कसाड कन्सल्टंट (जे.व्ही.) पुणे या सल्लागारांनी पांजरपोळ ते घाटकोपर या रस्त्यासाठी केलेल्या वाढीव कामाची रक्कम रु.६४.७२ लक्ष + सेवा कर इतक्या खर्चास संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या जमिनींचे तसेच मिळकतींचे संरक्षणाकरीता बंदुकधारी सुरक्षारक्षकांची आणि मिळकत परिकरांची (Estate Attendants) सुरक्षा व्यवस्था पुरविणा-या पात्र सुरक्षा ठेकेदारांची तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

८.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या मान्यतेने सप्टेंबर, २००६ पासून प्राधिकरणाच्या वेगवेगळया जमिनींचे आणि मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी पाच सुरक्षारक्षक ठेकेदारांना दरमहा प्रति बंदूकधारी सुरक्षारक्षक रु.४,२००/- या दराने नियुक्त करण्यात आले आहे. सध्या प्राधिकरणाच्या जमिनींचे व मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या बंदूकधारी सुरक्षारक्षकांची एकूण संख्या १३५६ इतकी आहे.

८.२ प्राधिकरणाने वेगवेगळया ठिकाणी बंदूकधारी सुरक्षारक्षकांची सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. तथापि, मिळकतींच्या सुरक्षेबरोबर इतर अनुषंगिक काही कामांसाठीही त्यांची सेवा वापरली जाते. अशा अनुषंगिक कामांकरिता मिळकत परिकर (Estate Attendants) म्हणून आवश्यक तेवढे मनुष्यबळ प्राप्त करणे संयुक्तिक ठरेल. सबब, वर्तमान कंत्राटामध्ये संपूर्णतः बंदूकधारी सुरक्षारक्षकांऐवजी आवश्यक तेवढे बंदूकधारी सुरक्षारक्षक व मिळकत परिकर अशा दोन प्रवर्गातील मनुष्यबळ पुरविणा-या ठेकेदारांच्या नियुक्तीसाठी जुलै, २००९ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या.

८.३ विहीत कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण ६ निविदांपैकी निविदेत नमूद केलेल्या अटीनुसार ४ निविदा पात्र ठरले. तथापि, अपात्र ठरलेल्या निविदाकारांपैकी एक मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स यांनी महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नियुक्ती व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत सूट प्रमाणपत्र सादर न केल्याने अपात्र ठरले. परंतु त्यांनी निवेदन केले की, त्यांनी निविदा सादर करण्यापूर्वीच सूट प्रमाणपत्र मिळणेसोठी अर्ज सादर केला आहे. परंतू न्यायालयीन प्रक्रियेमुळे तसे प्रमाणपत्र देखील मिळाले नाही. आता त्यांना तसे प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्याने त्यांच्या या विनंती संदर्भात प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांचे मत घेऊन त्यांची निविदा पात्र समजण्यात आली आहे.

८.४ प्राधिकरणास सुरक्षा रक्षक / मिळकत परिकर पुरविणा-या ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या वित्तीय बोली विचारात घेऊन सर्व पात्र ठेकेदारांची नेमणूक निविदेतील अटी व शर्तीवर बंदूकधारी सुरक्षारक्षक रु.५,१००/- प्रतिमहा या दराने व मिळकत परिकर रु.४,८००/- प्रतिमाह दराने पुरविण्याकरिता नेमणूक करण्यात यावी असा प्रस्ताव आहे.

८.५ बाब टिप्पणीतील प्रस्तावावर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा आणि माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडून प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार निविदीत दराने पुरवू शकतील का याबाबत शक्यता पडताळून पहावी. जर सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा आणि माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई यांनी वरील बाबतीत असमर्थता दर्शविली दर सदरच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करावी. तोपर्यंत सध्याची व्यवस्था कार्यरत ठेवण्यात यावी. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिलेल्या निर्देशासंदर्भात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्टीकरण दिले की, प्राधिकरणास आवश्यक असलेले कार्यक्षम मनुष्यबळ सदरच्या संघटना पुरवू शकत नसल्याने खाजगी सुरक्षा संस्थांकडून सदरचे आवश्यक मनुष्यबळ प्राधिकरण प्राप्त करीत आहे. तथापि, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे उपरोक्त निर्देशानुसार दोन्ही संघटनांच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन प्राधिकरणास आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली तर सदरच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यात येईल.

८.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ११५४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे (१) मे.बॉम्बे इन्टेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि. (२) मे.ईगल सिक्युरिटी अँड पर्सनल सर्व्हिस (३) मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इं) प्रा.लि., (४) मे.सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. या चार सुरक्षा ठेकेदारांची रु.५१००/- प्रति बंदुकधारी सुरक्षा रक्षक प्रतिमास

..२२/-

आणि रु.४८००/- प्रति मिळकत परिकर प्रतिमास या दराने (सर्व समावेशक दराने) प्राधिकरणाच्या मालमत्तेचे संरक्षण व व्यवस्थापन करण्याकरीता, सेवा पुरविण्याकरीता नेमणूकीच्या तारखेपासून तीन वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. तथापि, ठरावाची अंमलबजावणी करण्यापूर्वी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे बंदूकधारी सुरक्षा रक्षक व मिळकत परिकर ठरावामध्ये नमूद दरानुसार व आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्यास समर्थ व सक्षम असल्याबाबतची विचारणा सुरक्षारक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा व माजी सैनिक कल्याण मंडळ, मुंबई यांना करण्यात यावी व त्यांनी असमर्थता दर्शविली तर या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी. तोपर्यंत सध्याची सुरक्षा व्यवस्था कार्यरत ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या शिफारशीनुसार मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन क्षेत्रातील पायाभूत प्रकल्प अंमलात आणण्यासाठी सल्लागार मे.LEA International Ltd., Canada व LEA Associate South Asia Pvt. Ltd., New Delhi यांची तांत्रिक सहाय्यक सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

९.१ या बाब टिप्पणीतील प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांनी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेकडून मिळालेल्या तांत्रिक सहाय्यतेचा भाग म्हणून सर्वंकष परिवहन अभ्यास यशस्वीरित्या पूर्ण केला आणि अंतिम अहवाल सादर करण्यापूर्वी सर्व स्थानिक संस्थांना तसेच शासन स्तरावर वेळोवेळी बैठका घेऊन प्रसिध्दीसाठी सल्लामसलती (Publicity Consultation) करण्यात आल्या. तसेच प्रसिध्दीसाठी सल्लामसलती केल्यानंतर प्राधिकरणाने या अहवालास मान्यता दिली आणि अहवाल शासनाकडे सादर केला.

..२३/-

९.२ लोकसंख्या व रोजगारासाठी लागणा-या पायाभूत सुविधांवर अभ्यासाच्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :-

- ➢ प्रदेशाची सध्याची कमतरता व प्रवासाची मागणी पुरविण्यासाठी २०३१ पर्यंत अंदाजे रुपये २,०७,९५६/- कोटी एवढी गुंतवणूक अपेक्षित.
- ➢ सध्याच्या परिवहन परिस्थितीमध्ये सुधार तसेच प्रदेशातील रस्त्यांची व सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचा विकास.
- ➢ २०३१ पर्यंत क्रमशः मेट्रोचे जाळे ४३५ कि.मी., महामार्गाचे जाळे १७४० कि.मी. उपनगरीय रेल्वे २४८ कि.मी. एवढे प्रस्तावित केलेले आहे.
- ➢ एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणाची निर्मिती करण्यासाठी सहाय्य करणे. परिवहन व्यवस्थेच्या विकासासाठी एक समर्पित परिवहन निधी निर्माण करणे.
- ➢ एकत्रित भाडे संरचना आणि एक तिकिट योजना अंमलात आणणे.
- ➢ मुंबई प्रदेशातील योजना तसेच सर्व स्थानिक संस्थांचा विकास आराखडा परिवहन धोरणाच्या आधारावर अद्ययावत करणे.

९.३ जागतिक बँकेच्या तांत्रिक सल्लागार निवडीकरीता वितरीत झालेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जागतिक स्तरावर निविदा बोलावून M/s. LEA International Ltd.,Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांची २००५ साली नेमणूक करण्यात आली.

९.४ सर्वंकष परिवहन अभ्यासात केलेल्या शिफारशींना प्राधिकरण फार महत्व देते, या अभ्यासाच्या शिफारशी अंमलात आणणे हे खूप मोठे व जटील कार्य असून आपल्याकडे यासाठी एक सक्षम आणि अनुभव असलेल्या सल्लागाराची आवश्यकता आहे.

९.५ **तांत्रिक सहाय्यतेचा उद्देश आणि व्यापक विस्तार खालीलप्रमाणे आहे -**

**भाग अ**

**घटक १ - (८ महिने) - सर्वंकष परिवहन अभ्यास अंमलबजावणी आराखडा आणि विकास केंद्राचा शोध**

- प्राधिकरण आणि इतर सहभागी संस्थांकडे उपलब्ध असलेल्या निधीवर सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या शिफारशींच्या अंमलबजावणी आराखडयाची पुर्नआखणी व बारकाईने समीक्षण करणे व संबंधित मुद्दे (Factors).

- पुढील ५ ते १० वर्षामध्ये (२०१६/२०२१) प्रादेशिक महत्वाचे प्रकल्प अंमलात आणण्याचा आराखडा (Rolling Plan) तयार करणे.
- परिवहन व्यवस्थेच्या विकासासाठी एक समर्पित परिवहन पायाभूत निधी (Dedicated Transport Infrastructure Fund) निर्माण करणे.
- विकास केंद्रांचा शोध घेणे व शिफारस करणे.

**घटक २ - (१६ महिने) - प्रकल्प प्रारंभिक कामे आणि निधीबाबतचे तंत्र**

- प्राधिकरणाने तयार केलेल्या विनंती प्रस्तावाचे (RFP) अभ्यास करुन त्यानंतर विस्तृत सुसाध्यता अहवालासाठी विनंती प्रस्ताव तयार करणे. सल्लागारांची अल्पसूची (Short Listing) व निवड करण्यासाठी सहाय्य करणे आणि प्रकल्प अंमलबजावणीसाठी तयार केलेल्या अहवालांवर सल्ला देणे ज्यामध्ये प्रमुख प्रकल्पांसाठी निधी तंत्र आणि निविदा पत्र तयार करणे.
- अंमलबजावणी करण्यासाठी तयार असलेल्या प्रकल्पांसाठी कंत्राटदारांची निवड पूर्व योग्यता आणि निवड करण्यासाठी सहाय्य करणे.
- प्रमुख प्रकल्पांसाठी वित्तीय संस्थांकडून निधी मिळविण्याकरिता प्राधिकरणास सहाय्य करणे.

**भाग ब - विकास केंद्रांच्या विकासाबाबत तांत्रिक सहाय्यता आणि सल्लागार सेवा**

- शिफारस केलेल्या विकास केंद्रांचे प्राधान्यक्रम ठरविणे, त्या पाठोपाठ निवडक विकास केंद्रांसाठी संकल्पना आराखडा तयार करणे.

**भाग क - व्यावसायिक आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी तांत्रिक सहाय्य आणि सल्लागार सेवा**

- व्यावसायिक आराखडयामधील पायाभूत प्रकल्पाचे (परिवहन प्रकल्प सोडून) समीक्षण व पुर्नआखणी करणे
- शिफारस केलेल्या पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सहाय्य पूरविणे. तांत्रिक सहाय्यतेचा एकूण कालावधी २० महिन्यांचा आहे. भाग अ चा कालावधी अंदाजे ८ महिने व भाग ब आणि क चा कालावधी अंदाजे १६ महिने एकढा राहील. भाग ब आणि क यामधील घटक कार्ये अभ्यासाच्या

४ थ्या महिन्यापासून सुरु होतील व २० व्या महिन्यापर्यंत संपतील. सल्लागारांना अभ्यासासाठी प्राधिकरणातर्फे कार्यालयीन जागा प्रतिवर्षी रु. १/- प्रति चौ.मी. या दराने भाडेतत्वावर वडाळा येथे देण्यात येणार आहे.

९.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांना खालील प्रकारच्या कामाचा अनुभव आहे.

१) सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर प्रदेश यांच्यासाठी संस्थाविषयक सुधार अंमलात आणण्यासाठी तांत्रिक सहाय्यता केली.

२) जागतिक बँकेचे अर्थसहाय्य असलेल्या गुजरात राज्य महामार्ग प्रकल्पासाठी, प्रकल्प समन्वयसल्लामसलत सेवा गेल्या ५-६ वर्षापासून पुरवित आहेत.

३) रस्ते व इमारती विभाग, गुजरात शासन यांच्यासाठी संस्थानिक वृध्दी सेवा दिली. तसेच M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून संपूर्ण देशात चांगला अनुभव आहे.

९.७ M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांचा अनुभव आणि त्यांची मुंबई महानगर प्रदेशाबाबतची सुज्ञता बघता त्यांची एक स्त्रोत तांत्रिक सहाय्यता सल्लागार म्हणून पुढील २० महिन्यांसाठी नेमणूक करण्याचा प्रस्ताव आहे.

९.८ सदर प्रस्तावावर मा. मुख्य सचिव आणि अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांची या अगोदर झालेली नेमणूक कशा पध्दतीने केली असे विचारले यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरुन जागतिक स्तरावर निविदा मागवून त्यांची नेमणूक करण्यात आली होती.

९.९ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, त्या वेळेचा प्रती व्यक्ती प्रती महिना दर (man month rate) आणि आता सद्या प्रस्ताव केलेला

key man month rate यांच्यात किती फरक आहे. या संदर्भात प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाचे प्रमुख यांनी असे सांगितले की, सदर प्रस्तावानुसार प्रती व्यक्ती प्रती महिना दर आंतरराष्ट्रीयसाठी रु. ८ ते ११ लाख दरम्यान आहे तसेच प्रती व्यक्ती प्रती महिना भारतीय दर रु. ३ ते ५ लाख आहे आणि या २० महिने कालावधीच्या तांत्रिक सहाय्यतेची व्याप्ती विचारात घेता त्यांचे ६५ व्यावसायिक मनुष्यबळ (ज्यामध्ये ८ आंतरराष्ट्रीय आणि ५७ भारतीय मनुष्यबळ) तसेच ११५ व्यावसायिक सहाय्यक मनुष्यबळ अशी तरतुद केली आहे. सर्वंकष परिवहन अभ्यास करताना त्यावेळेचा M/s. LEA International Ltd., यांनी उल्लेख केलेला आंतरराष्ट्रीय दर रु. ७.६ लाख इतका तसेच भारतीय दर रु. १ ते ५ लाख असा २००४-२००५ च्या धर्तीवर इतका आहे. ते पुढे म्हणाले की, २००४ पासून मनुष्यबळाची झालेली वार्षिक पगारवाढ विचारात घेता M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांनी सादर केलेला प्रति महिना प्रती व्यक्ती मनुष्यबळाचा दर रास्त आहे.

९.१० मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, कार्यकारी समितीला अशाप्रकारच्या एक स्त्रोत तत्वावर खर्चाची मर्यादा विचारात न घेता तांत्रिक सहाय्यता सल्लागाराची नेमणूक करण्याचे अधिकार आहेत किंवा कसे यावर विधी सल्लागार श्री. के.एन.पटेल यांनी अशी माहिती दिली की, बांधकाम कामाची निविदा वगळता जेथे तांत्रिक आणि विशेष सल्लागारांची नियुक्ती करावयाची आहे, त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पूर्ण अधिकार आहेत.

९.११ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५५:</u>

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या

शिफारशी योजनाबध्द पध्दतीने अंमलात आणण्यासाठी M/s. LEA International Ltd., Canada व LEA Associates South Asia Pvt. Ltd., New Delhi यांची रुपये ५,७९,४८,१८३/- (सर्व करांसहित) या रकमेवर एकस्त्रोत तांत्रिक सहाय्यक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : प्राधिकरणातर्फे हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे आर्थिक व वित्तीय विश्लेषण करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक.**

**१०.१** या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे हाती घेण्यात येत असलेले प्रकल्प हे खूप मोठे असून त्यामध्ये बरीच वित्तीय गुंतवणूक करणे प्राधिकरणास भाग पडत आहे. प्राधिकरणातर्फे अशा प्रकारचे प्रकल्प हाती घेताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २४ (अ) अन्वये हे प्रकल्प तोटयात जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते व त्यामुळे अशाप्रकारचे प्रकल्प हाती घेण्यासाठी या सर्व प्रकल्पांचे वेळोवेळी तातडीने आर्थिक व वित्तीय विश्लेषण करणे आवश्यक असते. प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या सर्वच प्रकल्पांचे आर्थिक व वित्तीय विश्लेषण करुन व त्यावर प्राप्त होणा-या आर्थिक/वित्तीय परताव्याचा विचार करुन प्रकल्प निवडण्यात यावेत. प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या जमिनी तसेच प्राधिकरणाला असलेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकरणाच्या उत्पन्नाचा स्त्रोत कशाप्रकारे निर्माण करता येईल याविषयी अभ्यास करण्यासाठी फेब्रुवारी, २००९ मध्ये अशाच प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सल्लागारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. खाली नमूद केलेल्या सल्लागारांतर्फे निविदा सादर करण्यात आल्या होत्या.

१. केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि.

२. डिलॉईट टच तोहमत्सू इंडिया

३. फिडबॅक व्हेंचर्स प्रा.लि.

४. क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी इंडिया

या सर्व निविदांचा तांत्रिक व वित्तीय अभ्यास करुन प्राधिकरणाने मे.केपीएमजी ॲडव्हायझरी

..२८/-

सर्व्हिसेस प्रा.लि. यांची नेमणूक केली व त्यांनी त्यांचा अभ्यास पूर्ण केलेला आहे. त्यांना सोपविलेल्या कामाकरीता (प्रति दिन सरासरी रु.३०,०००/-) याप्रमाणे सल्लामसलत खर्च म्हणून देण्याचे ठरविण्यात आले. तसेच त्यांच्या सेवा पुढील २ वर्षाच्या कालावधीसाठी त्यांच्याशी करार करुन त्यांची सेवा उपलब्ध करुन घेण्याचा प्रस्ताव आहे.

१०.२ याबाबत मा.मुख्य सचिव व कार्यकारी समितीचे अध्यक्ष, यांनी असे सांगितले की, मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाला या सेवेची गरज लागेल तेव्हा त्याचा विचार करण्यात यावा. त्यांनी असेही निर्देश दिले की, मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने पॅनल तयार करावे व इतर कामाची यादी तयार करावी. यावर श्री.द.म.सुकथनकर, कार्यकारी समितीचे सदस्य यांनी असे सांगितले की, त्यांना २ वर्षानंतर पुन्हा नवीन आदेश द्यावेत. त्यानंतर, श्री.मनु कुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सेवेपुरताच दर लावावा. त्यानंतर, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, वरील चारही कंपनींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात यावा. त्यानुसार सदर तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे :-

| | निविदाकाराचे नांव | निविदेचा देकार |
|---|---|---|
| १. | केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. | रु. २४.८५ लाख |
| २. | डिलॉईट टच तोहमत्सू इंडिया | रु. २७.९० लाख |
| ३. | फिडबॅक व्हेंचर्स प्रा.लि. | रु. ३४.०० लाख |
| ४. | क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी इंडिया | रु. ३८.०० लाख |

१०.३ चर्चेअंती प्राधिकरणातर्फे राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांमध्ये मोठया प्रमाणावरील वित्तीय गुंतवणूकीची अपेक्षा असल्याने, अशा प्रकारचे प्रकल्प प्रत्यक्ष हाती घेण्यापूर्वी त्यांचे आर्थिक व वित्तीय विश्लेषण करणे आवश्यक आहे, त्यानुसार मे.के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी पूर्वी सादर केलेल्या निविदेच्या (प्रति दिन सरासरी रु.३०,०००/- अंदाजे) दरानुसार, पुढील दोन वर्षाच्या कालावधीसाठी, महानगर आयुक्त यांच्या रु.५० लाखापर्यंतच्या क्रयशक्तीच्या अधीन राहून प्राधिकरण हाती घेणार असलेल्या प्रकल्पांच्या आर्थिक व वित्तीय विश्लेषणाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

१०.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५६ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम २ चे पोट-कलम (चार) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि. यांची प्राधिकरणाच्या प्रकल्पाचे आर्थिक व वित्तीय विश्लेषण करण्यासाठी सल्लागार म्हणून त्यांनी पूर्वी सादर केलेल्या निविदेच्या (प्रति दिन सरासरी रु.३०,०००/- अंदाजे) दराने पुढील दोन वर्षांकरीता नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर नेमणूकीबाबत बाब टिप्पणीच्या जोडपत्रानुसार करारनामा करण्यास तसेच त्यांच्याकडे सोपविण्यात येणा-या प्रत्येक प्रकल्पासंबंधी स्वतंत्र करारनामा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.११</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशासाठी संकल्पना योजना तयार करणे - मुख्य सल्लागार व दोन पर्यवेक्षण सल्लागारांचा खर्च भागविणे.</u>**

११.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाची संकल्पना योजना (Concept Plan) तयार करण्यात येणार आहे. सदर संकल्पना योजना तयार करण्याच्या प्रक्रियेचे निरीक्षण करणे आणि त्यासाठी मार्गदर्शन करणे याकरिता महाराष्ट्र शासनाने एका सुकाणू समितीची स्थापना केली आहे. सदर सुकाणू समितीचे सदस्य निमंत्रक व मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिटचे (एमटीएसयू) प्रकल्प व्यवस्थापक श्री. यु.पी.एस. मदान यांना सदर प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीस माहिती देण्यास सांगितले.

११.२ सदर प्रस्तावाबाबत श्री.यु.पी.एस.मदान, प्रकल्प व्यवस्थापक, एमटीएसयू यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशासाठीची प्रादेशिक योजना (१९९६-२०११) व मुंबई शहरासाठीची विकास योजना सन २०११ पर्यंत अंमलात असून त्यामध्ये लवकरच सुधारणा

करण्यात येणार आहे. सदर बाब लक्षात घेता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील शक्तीप्रदत् समितीने आपल्या बैठकीमध्ये पुढील ५० वर्षासाठी मुंबई महानगर प्रदेशाची संकल्पना योजना तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे सुकाणू समितीने संकल्प योजना तयार करण्यासाठी राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांना नेमण्यासाठी त्यांच्याकडून प्रस्ताव मागविण्याचे निश्चित केले होते. त्याला अनुसरुन एमटीएसयूकडे देशातील व देशाबाहेरील ३९ सल्लागार संस्थांकडून अभिव्यक्ती स्वारस्याचे प्रस्ताव (Expression of Interest) प्राप्त झाले. यापैकी १४ सल्लागार संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. या १४ सल्लागार संस्थांपैकी ९ सल्लागारांनी तांत्रिक प्रस्ताव सादर केले. यापैकी लघुसूचीमधील पहिल्या ४ सल्लागारांना तांत्रिक प्रस्तावाचे सादरीकरण करण्यास सांगितले.

११.३ श्री.यु.पी.एस.मदान, प्रकल्प व्यवस्थापक, एमटीएसयू यांनी असेही सांगितले की, सुकाणू समितीने असे ठरविले आहे की, प्रस्तावित अभ्यासाला अंतर्गत तांत्रिक सहाय्य देण्यासाठी एक वा दोन तज्ञांची नेमणूक करण्याची गरज आहे. त्यानुसार मे. मॅकेन्झी आणि कंपनी यांनी या आधी मुंबई महानगर प्रदेशामध्ये विविध अभ्यास केले असल्याने त्यांच्याकडे महानगर प्रदेशाबाबत माहिती उपलब्ध असल्यामुळे एकमेव स्त्रोत आधारे रु. १.५० कोटी फी अधिक सेवाकर वर सल्लागांराना प्रशासकीय सहाय्य देण्यासाठी नेमणूक केली आहे. तसेच सिंगापूर को-ऑपरेशन एंटरप्राईज (एससीई) यांना सिंगापूर डॉलर (एसजीडी) - ५५,००० फी अधिक प्रवासाचा व भोजनाचा प्रत्यक्ष खर्च वर सल्लागारांना तांत्रिक सहाय्य देण्यासाठी नेमणूक केली आहे. या दोन तज्ञांची फी व इतर खर्च प्राधिकरणाने भागवावा असेही सुकाणू समितीने ठरविले आहे.

११.४ श्री.यु.पी.एस.मदान, प्रकल्प व्यवस्थापक, एमटीएसयू यांनी असेही स्पष्ट केले की, प्रस्तावांची विनंतीसंबंधी कागदपत्रे तयार करणे आणि निविदांचे मूल्यमापन करणे याकरिता तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यासाठीची तातडीची गरज विचारात घेता, महानगर आयुक्त यांनी एमटीएसयूला नेमणूक करण्यासंबंधीची पुढील कार्यवाही करण्यास सांगितले आणि याकरिता कार्यकारी समितीची कार्योत्तर मंजूरी प्राप्त करण्याचे प्रस्तावित केले. दोन्ही तज्ञ कंपन्यांनी आतापर्यंत दिलेल्या सहाय्याच्या मोबदल्यात आंशिक निधी वितरित करण्याची विनंती केली होती.

यासंबंधीची तातडीची गरज विचारात घेता मे. मॅकेन्झी आणि कंपनी यांना रु. ६६.१८ लाख आणि मे. एससीई यांना रु. ३०.४५ लाख अशी एकूण रु ९६.६३ कोटी रक्कम वितरण करण्यासाठी एमटीएसयूकडे अग्रीम म्हणून जमा केले आहेत व या रकमांमध्ये सेवा कराचा समावेश आहे. एमटीएसयूने कराराप्रमाणे रक्कम अदा करावयाची आहे.

११.५ प्रकल्प व्यवस्थापक, एमटीएसयू यांनी असेही सांगितले की, सुकाणू समितीने आपल्या बैठकीमध्ये सल्लागारांच्या तांत्रिक व वित्तीय प्रस्तावांच्या केलेल्या मूल्यमापनानुसार मे. सुरबाना इंटरनॅशनल कन्सल्टंटस् (इंडिया) लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. सदर नियुक्त केलेल्या सल्लागाराची सांगितलेली फी रु. ६.५१ कोटी + सेवाकर इतकी आहे. तसेच, सदर बैठकीमध्ये प्रकल्प व्यवस्थापक, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट (एमटीएसयू) यांना संकल्पना योजना तयार करण्याचा अभ्यास सुरु करण्यासाठी प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची मंजूरी घेतल्यानंतर मे. सुरबाना इंटरनॅशनल कन्सल्टंटस् (इंडिया) लि. यांच्याबरोबर सल्लागार म्हणून करार करण्यास अधिकृत करण्याचे ठरविले आहे. सल्लागार नियुक्तीच्या सर्व प्रक्रियेसाठी एमटीएसयूने नेमलेल्या अंतर्गत तज्ञांची मदत घेण्यात आली आहे.

११.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५७ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३)(ii) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा तसेच यासंबंधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे पुढील प्रस्ताव मंजूर करीत आहे :

अ) एमटीएसयूने विनंती केल्यानुसार मुंबई महानगर प्रदेशाची संकल्पना योजना तयार करण्यासाठी जागतिक स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून निवडलेल्या मे. सुरबाना इंटरनॅशनल कन्सल्टंटस (इंडिया) लि. या सल्लागाराचा सुमारे रु. ६.५१ कोटी + सेवाकर हा खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ब) सुकाणू समितीने विनंती केल्यानुसार तज्ञ म्हणून अंतर्गत तांत्रिक सहाय्य देण्याकरिता मे. मॅकेन्झी आणि कंपनी आणि मे. एससीई यांना एकमेव स्त्रोत (सोल सोर्स) आधारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-४ मध्ये उल्लेखिलेल्या खर्चावर एमटीएसयूने केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

क) मे. मॅकेन्झी आणि कंपनी व मे. एससीई या दोन्ही कंपन्यांना आंशिक निधी म्हणून देण्याकरीता एमटीएसयूला अग्रीम स्वरुपात दिलेल्या एकूण रु. ९६.६३ लाख रक्कमेला कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

"**असाही टराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१२ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी - सहामाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक १ एप्रिल, २००९ ते ३० सप्टेंबर, २००९.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ एप्रिल, २००९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००९ पर्यंतच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जुलै, २००९ ते ३० सप्टेंबर, २००९.</u>**

दिनांक १ जुलै, २००९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००९ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१४ : दिनांक ३०.६.२००९ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २००९ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१५ : दिनांक ३०.९.२००९ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २००९ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१६ : प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलात बांधलेल्या निवासी इमारतीमधील महानगर आयुक्त, अतिरिक्त महानगर आयुक्त व सह महानगर आयुक्त यांचेसाठी असलेल्या निवासी सदनिकांमध्ये विविध सेवा पुरविणेबाबत.**

**१६.१** या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.२८ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या बैठकीत प्राधिकरणासाठी निवासी इमारतीचे बांधकाम करण्यास, मंजूरी प्राप्त झाली होती. त्यानुसार वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' ब्लॉकमधील भूखंड क्र.आर-१४ व आर-१५ यावर निवासी इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आलेले होते. सदर निवासी इमारतीमध्ये महानगर आयुक्त यांच्या निवासस्थानाव्यतिरिक्त इतर वरिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांच्या ३१ (एकतीस) निवासस्थानांचा समावेश असून या इमारतीचे काम जवळपास पुर्णत्वाकडे आहे. इमारतीच्या कामांमध्ये स्थापत्य बांधकाम व विदयुत कामांसंबंधीत जुजबी/योग्य त्या बाबींचा समावेश केलेला आहे. लवकरच महानगर आयुक्तांसह, अतिरिक्त महानगर आयुक्त, सह महानगर आयुक्त या इमारतीत अधिवासासाठी दाखल होणार आहेत.

**१६.२** मुंबई महानगरपालिका तसेच इतर निमशासकीय संस्थांच्या आयुक्त, अति.आयुक्त, सह आयुक्त स्तरावरील अधिका-यांना वरीलप्रमाणे सोयीसुविधा त्या त्या प्राधिकरणातर्फे/ आस्थापनेतर्फे पुरविण्यात येतात. तसेच या व्यतिरिक्त, या सर्व सेवा कार्यान्वित ठेवण्यासाठी येणारा नियमित खर्च (उदा. वीज देयक, दूरध्वनी देयक, इंटरनेट देयक, इ. मासिक व वार्षिक देयके) हा सुध्दा त्या त्या प्राधिकरणातर्फे / आस्थापनेतर्फे करण्यात येत असतो. त्याच धर्तीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, अतिरिक्त महानगर आयुक्त व सह महानगर आयुक्त यांचेसाठीही आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव आहे.

१६.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ११५८ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त, अति.आयुक्त व सह आयुक्त यांना उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या सोयीसुविधांच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या महानगर आयुक्त, अतिरिक्त महानगर आयुक्त, सह महानगर आयुक्त या स्तरावरील अधिका-यांना योग्य त्या सोयीसुविधा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यासंबंधी व त्याअनुषंगाने लागणा-या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP) विरार (पू.) या रेल्वे स्थानक परिसरात स्कायवॉक (आकाशमार्गिका) बांधणे. — मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

१७.१ महानगर आयुक्त यांनी स्कायवॉक प्रकल्पाच्या संदर्भात माहिती देताना असे स्पष्ट केले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशातील विविध रेल्वेस्थानकालगत ६७ स्कायवॉक बांधण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्यापैकी ५१ कामे प्रगतीपथावर आहेत.

१७.२ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विरार (पूव) येथील स्कायवॉकचे बांधकाम करताना स्थळ परिस्थितीनुसार, स्थानिक, लोकप्रतिनिधी, आमदार यांच्या विनंतीनुसार प्रकल्पाच्या रुपरेषेत व व्याप्तीत बदल झाला. या कामाच्या खर्चात वाढ होण्याची मुख्य कारणे म्हणजे कामाच्या व्याप्तीत वाढ व specification मध्ये बदल, क्युरींगसाठी लागणारा वेळ व RCC खांब उभारण्यासाठी लागणा-या जागेच्या अभावी RCC खांबांऐवजी लोखंडी खांब वापरणे अपरिहार्य, स्कायवॉकच्या रुंदीत ३ मी.ऐवजी ४ मी. एवढी वाढ, या व्यतिरिक्त ८ मी. रुंदीची व ४५ मी. लांबीच्या viewing gallery चा समावेश, प्रकल्प सल्लागारांनी केलेले चुकीचे अंदाजपत्रक वगैरे ही होत.

१७.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या कामाचा कालावधी ६ महिने असताना काम पूर्ण करण्यास विलंब का झाला अशी विचारणा केली. यावर सह महानगर आयुक्त यांनी सर्वसाधारणपणे सर्वच स्कायवॉकच्या कामात येणा-या अडचणींबाबत जसे, जिन्याची जागा निश्चित करणे, वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग व नियंत्रण, जमिनीखालील सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, स्थानिक लोकांचा कामास विरोध इ. कारणांमुळे विलंब झाल्याचे सांगितले. यावर मा. मुख्य सचिव यांनी कंत्राटदाराला निविदेतील अटींच्या अधिन राहून व त्या प्रकरणाची गुणवत्ता पडताळून आवश्यकतेनुसार कंत्राटदारावर योग्य ती कार्यवाही करण्याचे सुचविले.

१७.४ चर्चेच्या दरम्यान श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी ज्या ठिकाणी लोकांचा किंवा लोकप्रतिनिधींचा विरोध आहे अशा ठिकाणी स्कायवॉक वगळण्याचे सुचविले. महानगर आयुक्तांनी हे मान्य करुन अशी माहिती दिली की आम्ही मुलूंड (प.) वगळून बाकी सर्व ठिकाणच्या स्थानिक तक्रारी व विरोध विचारात घेऊन त्याप्रमाणे सदरील ठिकाणच्या प्रश्नांचे निराकरण केले आहे.

१७.५ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वाढीव खर्च हा कंत्राटास अनुसरुन आहे किंवा कसे अशी विचारणा केली असता अति.मुख्य अभियंता यांनी होकारात्मक माहिती दिली.

१७.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११५९ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे विरार (पू) येथे रेल्वे स्थानकालगत स्कायवॉक कामाच्या सुधारित खर्चास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | स्विकृत निविदा रक्कम (रुपये) | सुधारित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि., मुंबई | ४,२४,६०,७४२ | ११,१३,७७,३४० |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजुरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP) विरार (प.) या रेल्वे स्थानक परिसरात स्कायवॉक (आकाशमार्गिका) बांधणे.**
**– मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**१८.१** या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, १) या कामाच्या खर्चात वाढ होण्याची मुख्य कारणे विरार (पूर्व) स्कायवॉक प्रमाणेच म्हणजे कामाच्या व्याप्तीत वाढ व specification मध्ये बदल, क्युरींगसाठी लागणारा वेळ व RCC खांब उभारण्यासाठी लागणा-या जागेच्या अभावी RCC खांबांऐवजी लोखंडी खांब वापरणे अपरिहार्य, स्कायवॉकच्या रुंदीत ३ मी.ऐवजी ४ मी. एवढी वाढ, प्रकल्प सल्लागारांनी केलेले चुकीचे अंदाजपत्रक वगैरे ही होत.

**१८.२** मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या कामाचा कालावधी ९ महिने असताना काम पूर्ण करण्यास विलंब का झाला अशी विचारणा केली. यावर सह महानगर आयुक्त यांनी सर्वसाधारणपणे सर्वच स्कायवॉकच्या कामात येणा-या अडचणींबाबत जसे, जिन्याची जागा निश्चित करणे, वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग व नियंत्रण, जमिनीखालील सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, स्थानिक लोकांचा कामास विरोध इ. कारणांमुळे विलंब झाल्याचे सांगितले. यावर मा. मुख्य सचिव यांनी कंत्राटदाराला निविदेतील अटींच्या अधीन राहून व त्या प्रकरणाची गुणवत्ता पडताळून आवश्यकतेनुसार कंत्राटदारावर योग्य ती कार्यवाही करण्याचे सुचविले.

**१८.३** चर्चेदरम्यान, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी ज्या ठिकाणी लोकांचा किंवा लोकप्रतिनिधींचा विरोध आहे अशा ठिकाणी स्कायवॉक वगळण्याचे सुचविले. महानगर आयुक्तांनी हे मान्य करुन अशी माहिती दिली की आम्ही मुलुंड (प.) वगळून बाकी सर्व ठिकाणच्या स्थानिक तक्रारी व विरोध विचारात घेऊन त्याप्रमाणे सदरील ठिकाणच्या प्रश्नांचे निराकरण केले आहे.

..३७/-

१८.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वाढीव खर्च हा कंत्राटास अनुसरुन आहे किंवा कसे अशी विचारणा केली असता अति.मुख्य अभियंता यांनी होकारात्मक माहिती दिली.

१८.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११६० :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे विरार (प) येथे रेल्वे स्थानकालगत स्कायवॉक कामाच्या सुधारित खर्चास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | स्विकृत निविदा रक्कम (रुपये) | सुधारित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि., मुंबई | ९,१५,८५,३७८ | २०,२८,५७,४८२ |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजुरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१९</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP) दहिसर (प.) या रेल्वे स्थानक परिसरात स्कायवॉक (आकाशमार्गिका) बांधणे.</u>**
**<u>– मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

१९.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या कामाच्या खर्चात वाढ होण्याची मुख्य कारणे विरार (पूर्व) व (पश्चिम) प्रमाणे म्हणजे कामाच्या

व्याप्तीत वाढ व specification मध्ये बदल, क्युरींगसाठी लागणारा वेळ व RCC खांब उभारण्यासाठी लागणा-या जागेच्या अभावी RCC खांबांऐवजी लोखंडी खांब वापरणे अपरिहार्य वगैरे ही होत. या व्यतिरिक्त दहिसर (पश्चिम) येथे अधिक सुमारे ३८० मी.लांबीचे संलग्न काम हाती घेतल्यामुळे व सर्व कामांवर ACP Paneling सारख्या अतिरिक्त बाबींचा समावेश केल्याने खर्चात वाढ झाल्याचे सांगितले.

१९.२ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या कामाचा कालावधी ६ महिने असताना काम पूर्ण करण्यास विलंब का झाला अशी विचारणा केली. यावर सह महानगर आयुक्त यांनी सर्वसाधारणपणे सर्वच स्कायवॉकच्या कामात येणा-या अडचणींबाबत जसे, जिन्याची जागा निश्चित करणे, वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग व नियंत्रण, जमिनीखालील सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, स्थानिक लोकांचा कामास विरोध इ. कारणांमुळे विलंब झाल्याचे सांगितले. यावर मा. मुख्य सचिव यांनी कंत्राटदाराला निविदेतील अटींच्या अधीन राहून व त्या प्रकरणाची गुणवत्ता पडताळून आवश्यकतेनुसार कंत्राटदारावर योग्य ती कार्यवाही करण्याचे सुचविले.

१९.३ चर्चेदरम्यान, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी ज्या ठिकाणी लोकांचा किंवा लोकप्रतिनिधींचा विरोध आहे अशा ठिकाणी स्कायवॉक वगळण्याचे सुचविले. महानगर आयुक्तांनी हे मान्य करुन अशी माहिती दिली की आम्ही मुलूंड (पश्चिम) वगळून बाकी सर्व ठिकाणच्या स्थानिक तक्रारी व विरोध विचारात घेऊन त्याप्रमाणे सदरील ठिकाणच्या प्रश्नांचे निराकरण केले आहे.

१९.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वाढीव खर्च हा कंत्राटास अनुसरुन आहे किंवा कसे अशी विचारणा केली असता अति.मुख्य अभियंता यांनी होकारात्मक माहिती दिली.

१९.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ११६१ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..३९/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दहिसर (पश्चिम) येथे रेल्वे स्थानकालगत स्कायवॉक कामाच्या (मुळ व वाढीव काम धरुन) सुधारित खर्चास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह तसेच वाढीव कामावर सल्लागाराच्या फी पोटी होणा-या रु. २५.६० लक्ष खर्चास अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | स्विकृत निविदा रक्कम (रुपये) | सुधारित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | मे. ईस्ट कोस्ट कन्स्ट्रक्शन्स आणि इंडस्ट्रिज लि. | २२,४२,५६,७९२ | ४०,४९,१३,८४० |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजुरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२० : बांधा, वापरा, हस्तांतरण करा या तत्वावर पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग, वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर उभारण्यात आलेल्या बस थांब्याच्या (बस-क्यु-शेल्टर) निविदाकारांनी केलेल्या मागण्यावर निर्णय घेण्याबाबत.**

२०.१ या बाब टिप्पणीतील प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सार्वजनिक जाहिरातीव्दारे प्राधिकरणामार्फत बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर पश्चिम आणि पूर्व द्रुतगती महामार्गावर अनुक्रमे पॅकेज-१ व २ अंतर्गत आणि वांद्रे-कुर्ला संकुल व जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर पॅकेज-३ अंतर्गत बस थांबे उभारण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील अधिकतम देकाराची निविदा स्विकारण्यासाठीचा प्रस्ताव कार्यकारी समितीने ठराव क्र. १०३४ अन्वये मंजूर करुन पॅकेज-१ अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गासाठी मे. राजदीप

पब्लिसिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून प्राप्त झालेला वित्तीय देकार, तसेच पॅकेज-२ आणि ३ अंतर्गत अनुक्रमे पूर्व द्रुतगती महामार्ग आणि वांद्रे - कुर्ला संकुल व जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता यांच्यासाठी मे. जे. सी. डिकॉक्स ॲडव्हर्टायजिंग इंडिया प्रा. लि. यांच्याकडून प्राप्त झालेले वित्तीय देकार स्विकारण्यास मान्यता दिली होती.

२०.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, सदर पॅकेज १ व २ अंतर्गत बस थांब्यांच्या उभारणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने, दिनांक ९/२/२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास "ना-हरकत प्रमाणपत्र" दिले. परंतु त्यामध्ये प्राधिकरण, निविदाकार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग असा त्रिपक्षीय करार प्राधिकरणास करावा लागेल व हा करार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मान्य करुन घ्यावा लागेल अशी अट घालण्यात आली. प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मे. राजदिप पब्लिसिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात पॅकेज १ अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावर ६५ बस थांबे उभारण्यासाठी दि. १६/११/२००७ व ३४ अतिरिक्त बस थांबे उभारण्याकरिता दिनांक ०९/०९/२००८ रोजी त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला. तसेच, प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मे. जे. सी. डिकॉक्स ॲडव्हर्टायजिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात पॅकेज २ अंतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावर बस थांबे उभारण्यासाठी दिनांक २७/१०/२००८ रोजी त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला.

२०.३ महानगर आयुक्त यांनी सदर पॅकेज १, २ व ३ अंतर्गत आतापर्यंत उभारण्यात आलेल्या बस थांब्याबाबत माहिती दिली. तसेच सदर कामाची अंमलबजावणी करताना उद्‌भवलेल्या प्रमुख मुद्यांची माहिती सांगून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला.

अ) <u>आगाऊ वार्षिक हप्त्याचे आगाऊ मासिक हप्त्यात रुपांतर करणे : -</u>

याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.राजदीप पब्लिसिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून दुसरा आगाऊ वार्षिक हप्ता प्राधिकरणास प्राप्त झाला नसून त्यांनी आपल्या दिनांक २२.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये सदर हप्ता हा सध्या अस्तित्वात असलेल्या जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर भरता येणार नाही व वार्षिक हप्त्याऐवजी मासिक हप्ता भरण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्राधिकरणास केली आहे.

या संदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जागतिक मंदीच्या परिस्थितीचा विचार करता विशेष बाब म्हणून निविदाकाराकडून फेब्रुवारी २००९ ते २८ फेब्रुवारी २०११ पर्यंत आगाऊ वार्षिक हप्त्याऐवजी आगाऊ मासिक हप्ता घेण्यास मान्यता द्यावी व सदर हप्ता हा खालील सुत्राप्रमाणे आकारण्यास मान्यता द्यावी.

( Advance Annual Installment + Accrued Interest for 12 months) = ( EMI for 12 months + Accrued Interest on EMI )

अशी रक्कम जमा केल्यास प्राधिकरणाकडे जमा होणा-या एकूण उत्पन्नामध्ये कोणतीही घट होणार नाही परंतू त्याचबरोबर निविदाकाराला सवलतही मिळेल. तसेच पॅकेज १, २ व ३ साठी दि. २८ फेब्रुवारी, २०११ पर्यंत वरील उल्लेखित सुत्राप्रमाणे आगाऊ मासिक हप्ता घेण्यास मान्यता द्यावी.

ब) **<u>५% रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास भरण्याबाबत :-</u>**

याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की प्राधिकरण, निविदाकार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात पश्चिम व पूर्व द्रुतगती महामार्गावर पॅकेज १ व २ अंतर्गत बस थांब्यांच्या उभारणीसंदर्भात करण्यात आलेल्या त्रिपक्षीय करारनाम्यातील अट क्र. ६ अन्वये निविदाकारांकडून देण्यात येणा-या वित्तीय देकाराच्या रक्कमेच्या ५% एवढी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास द्यावयाची आहे.

प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पा (MUIP) अंतर्गत पश्चिम आणि पूर्व द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण, सौंदर्यीकरण, पावसाच्या पाण्याच्या निच-याचे गटारीकरण, पदपाथ, रोडमार्कींग इ. कामे आपल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून पूर्ण केली आहेत. तसेच दि. १ नोव्हेंबर २००३ च्या शासन आदेशामध्ये सदर प्रकल्पावर होणारा खर्च प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाने वसूल करण्याची तरतूद असल्याने वरील उल्लेखित कराराच्या अट क्र. ६ प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राधिकरणाकडे अथवा निविदाकारांकडे सदर रक्कमेसाठी आग्रह धरु नये असे कळविण्याचा प्रस्ताव आहे.

क) **<u>बेस्टबरोबर वाटणी :-</u>**

याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पॅकेज - ३ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर काही भागात बेस्टमार्फत बस थांबे उभारण्यात

..४२/-

आले व त्यावरील जाहिरातीचे हक्क बेस्टमार्फत वाटप करण्यात आले. तथापि, संपूर्ण जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर बस थांब्यांच्या उभारणीबाबत समानता आणण्यासाठी दि. २६.०६.२००८ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत पॅकेज-३ अंतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर प्राधिकरणाने बस थांबे उभारावेत परंतू सदर बांधण्यात येणा-या बस थांब्याद्वारे मिळणारे उत्पन्न बेस्टला देण्यात यावे असे ठरले. सदर उत्पन्नाच्या रक्कमेसाठी बेस्टने विविध पत्राद्वारे मागणी केली आहे.

२०.४ जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याची अंमलबजावणी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत (MUTP) करण्यात येत असल्याने सदर रस्त्यांवर बस थांबे उभारण्याचे काम पॅकेज-३ अंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून सदर प्रकल्पावर प्राधिकरणाकडून देखभाल होणार असल्याने व या प्रकल्पाची मालकी प्राधिकरणाकडे राहणार असल्याने बेस्टला देय असलेल्या जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर उभारण्यात येणा-या बस थांब्याद्वारे मिळणा-या उत्पन्नातील २५% उत्पन्न प्राधिकरणाच्या प्रशासकीय खर्चाच्या पूर्ततेसाठी वळती करुन उर्वरित रक्कम बेस्टला देण्यास मान्यता द्यावी.

२०.५ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वरील प्रकल्पांतर्गत प्राधिकरणाला प्राप्त होणा-या एकूण उत्पन्नाविषयी विचारणा केली, यावर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले की, एकूण अपेक्षित असलेल्या २१९ बस थांब्यांपैकी १७० बस थांबे आतापर्यंत उभारण्यात आले असून त्याद्वारे प्राधिकरणास रु. ५.९ कोटी इतकी रक्कम आतापर्यंत प्राप्त झाली आहे. त्यानंतर, मुख्य सचिवांनी (अ) येथील उल्लेखित प्रस्तावाद्वारे प्राधिकरणाच्या उत्पन्नात होणा-या तफावती विषयी वित्त सल्लागार यांचे मत विचारले. त्यावर वित्त सल्लागारांनी उक्त प्रस्तावान्वये प्राधिकरणाच्या उत्पन्नात कोणतीही घट होणार नाही असे सांगितले.

२०.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र ११६२:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे बाब टिप्पणीतील प्रस्ताव क्र. (अ) पॅकेज १, २ व ३ याकरीता आगाऊ वार्षिक हप्त्याचे रुपांतर आगाऊ मासिक हप्त्यात करण्यास व बाब टिप्पणीतील सुत्राप्रमाणे निविदाकाराकडून मासिक हप्ता दिनांक २८/०२/२०११ पर्यंत वसूल करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील प्रस्ताव क्र. (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पॅकेज १ व २ अंतर्गत करण्यात आलेल्या त्रिपक्षीय करारातील अट क्र. ६ प्रमाणे निविदाकाराकडून प्राधिकरणाकडे जमा होणा-या वित्तीय देकार रक्कमेच्या ५% एवढी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राधिकरणाकडे मागण्याचा आग्रह धरु नये असे सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील प्रस्ताव क्र. (क) मध्ये, नमूद केल्याप्रमाणे पॅकेज - ३ अंतर्गत, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर उभारण्यात येणा-या बस थांब्याव्दारे मिळणा-या उत्पन्नातील २५% उत्पन्न प्राधिकरणाच्या प्रशासकीय खर्चाच्या पूर्ततेसाठी वळती करुन उर्वरित रक्कम बेस्टला देण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अमंलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि वरील विषयांव्यतिरिक्त हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यासाठी लागणा-या इतर सर्व बाबींवर निविदाकारांच्या विनंतीवर सर्वंकष विचार करुन निर्णय घेण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र. १ : बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परिवहन (बेस्ट) उपक्रमास ४६८सी.एन.जी. बसगाडया खरेदीसाठी प्राधिकरणाच्या राखीव निधीमधून रु.८८.४० कोटीचे कर्ज उपलब्ध करुन देणेबाबत.**

या बाब टिप्पणीतील प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन (बेस्ट) उपक्रमाने ४६८ नवीन सी.एन.जी बसगाडया

खरेदी करण्याकरीता प्राधिकरणाच्या राखीव निधीमधून रु. ९० कोटीचे कर्ज देण्याची विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला केली आहे. बेस्ट समितीने दि. १२ जुलै, २००७ रोजी त्यांच्या ठराव क्र. BCR ५९३ च्या अंतर्गत ४६८ बसगाडया खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता. सद्य:स्थितीत मुंबई शहरात दर दिवशी प्रवास करणा-या प्रवाशांची संख्या १.१ कोटी इतकी असून साधारणत: ८८% लोक सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करतात. बेस्ट उपक्रमाकडे सध्या ३९७८ बसगाडया असून दररोज ४५ लाख लोक या बस गाडयांमधून प्रवास करतात आणि एकूण वाहतूकीच्या २५% एवढी वाहतूक मुख्यत: उपनगरीय रेल्वे स्थानकांना पूरक म्हणून कार्य करते. सध्याच्या ताफ्यातील बसगाडया जुन्या झालेल्या आहेत आणि त्यांच्या परिचलन व देखभालीसाठी लागणारा प्रतिमाह खर्च हा प्रतिमाह उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

२. महानगर आयुक्त यांनी पुढे माहिती देताना असेही सांगितले की, शहरी परिवहन सेवेसाठी १ लाख लोकसंख्येमागे ४० बसगाडयांची गरज आहे. मुंबई शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता पुढील वर्षामध्ये बेस्ट परिवहन सेवेसाठी १,६०६ बसगाडया खरेदी करण्याची गरज आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान (JNNURM) अंतर्गत केंद्र शासनाकडून बेस्ट उपक्रमाला १,००० बसगाडया खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर झाले आहे. प्रवाशांची वाढती मागणी तसेच ताफ्यातील जुन्या बसगाडया निष्काषित करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने ४७ प्रवासी आसनक्षमता + १९ उभे प्रवासी क्षमता, भारत टप्पा ३ CNG इंधनावर आधारीत इंजिन, १५ वर्ष/१० लाख कि.मी. आयुष्यमान असलेल्या ४६८ नवीन सी.एन.जी. बसगाडया खरेदी केल्या आहेत. सदर बसगाडया खरेदी करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने रु. ८८.३९ कोटी एवढा खर्च केला आहे. सदर खर्चाची प्रतीपुर्ती करण्यासाठी उपक्रमाने प्राधिकरणाला राखीव निधीमधून रु.९० कोटी एवढे कर्ज ६ वर्ष परतफेड कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.

३. त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या सदरहू कर्ज विनंतीबाबतचा तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन अहवाल प्राधिकरणामार्फत करण्यात आला आहे. मुल्यमापन अहवालामध्ये बेस्ट उपक्रमाची सद्याची आर्थिक स्थिती, सध्याच्या ताफ्यातील कालबाहय झालेल्या बसेस, प्रवाशांची वाढती मागणी व नवीन बसगाडयांची

आवश्यकता, इत्यादी बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत. बृहन्मुंबई विद्युतपुरवठा परिवहन उपक्रमाच्या कर्ज परतफेडीबाबतच्या धोरणात पुढील पाच वर्षाचे अंदाजित उत्पन्न आणि खर्च गृहीत धरण्यात आला आहे. बेस्ट उपक्रमाच्या बस परिवहन विभागाला मागील ४ वर्ष सतत तोटा होत आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत विकत घेतलेल्या १००० बसगाडया व ४६८ सी.एन.जी. बसगाडया उपयोगात आणल्यानंतर जुन्या बसगाडयांच्या देखभालीसाठी लागणारा खर्च कमी होईल व बेस्टचे उत्पन्न वाढेल असे अपेक्षित आहे. कर्ज वितरीत करण्यापूर्वी मुंबई महानगरपालिकेकडून कर्जाची व त्यावरील व्याजाची परतफेड करण्याची हमी घेण्यात येईल. त्यामुळे व्याजाची व मुद्दल रक्कमेची परतफेड करण्याची संपूर्ण जबाबदारी पूर्णतः मुंबई महानगरपालिकेची असेल. प्राधिकरणाने स्थापन केलेल्या राखीव निधीच्या नियम ४ व ५ नुसार बसगाडया खरेदी करण्यासाठी प्राधिकरण कर्ज मंजूर करु शकते. बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परीवहन (बेस्ट) उपक्रमास आवश्यक असलेल्या निधीची गरज लक्षात घेऊन रु.८८.४ कोटीचे कर्ज ६ वर्षांच्या कालावधीसाठी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

४. वरील प्रस्तावाबाबत मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाने विविध महानगरपालिकांना उपलब्ध करुन दिलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबतच्या स्थितीबद्दल विचारणा केली. यावर महानगर आयुक्तांनी माहिती दिली की, कर्ज परतफेडीची स्थिती समाधानकारक आहे व सर्व महानगरपालिका वेळेवर कर्जपरतफेड करीत आहेत. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती आणि यांनी असे सुचविले की, MUTP अंतर्गत कर्जामार्फत घेतलेल्या बसेसवर MUTP असे दर्शविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या राखीव निधीतून खरेदी करण्यात येणा-या बसेसवर दर्शनी भागामध्ये MMRDA असे दर्शविण्याची कार्यवाही करावी. तसेच कर्जाच्या करारनाम्यामध्ये सदर बाबींचा उल्लेख असावा.

५. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पूढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र ११६३:**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (राखीव निधीमधून कर्ज मंजूरी) विनियम, १९९२ च्या विनियम क्रमांक ७.१ अन्वये प्राप्त

..४६/-

झालेल्या आधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून बृहन्मुंबई विद्युतपुरवठा व परीवहन उपक्रमास विलंब कालावधीच्या सुविधांशिवाय व सहा वर्षामध्ये परतफेड करावयाच्या अटींवर ४६८ नवीन सी.एन.जी. बसगाडया खरेदी करण्यासाठी द.सा.द.शे ८% दराने रु. ८८.४ कोटी इतके कर्ज देण्यास मान्यता देत आहे. सदर कर्जाच्या रकमेतून खरेदी करण्यात आलेल्या बसेसवर MMRDA असे दर्शविण्यात यावे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र. २</u> : <u>दिनांक ३१.१२.२००९ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००९ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

********************